# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनि

**दिनांकः30.03.2026** **वारः सोमवार**

1. पंतप्रधान आज आसाम आणि पुदुचरीच्या पक्ष कार्यकर्त्यांशी नमो ॲपच्या माध्यमातून साधणार संवाद
2. पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य असल्याचा पंतप्रधानांचा पुनरूच्चार
3. आगामी निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर पश्चिम बंगालमधील 170 पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांच्या बदल्या
4. अमेरिकेने गुप्तपणे इराणमध्ये जमिनीवरील आक्रमणाची योजना आखल्याचा इराण संसद अध्यक्षांचा आरोप आणि
5. पहिल्या 'खेलो इंडिया आदिवासी क्रीडा स्पर्धे'च्या पाचव्या दिवशी महाराष्ट्राच्या खेळाडूची सुवर्णपदकाची कमाई

**<u>मेरा बूथ-पंतप्रधान</u>**

पंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नमो ॲपच्या माध्यमातून मेरा बूथ सबसे मजबूत संवाद या उपक्रमाअंतर्गत, आज आसाम आणि पुदुचरीच्या पक्ष कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत. गेल्या दशकभराच्या कालावधीत आसामची प्रगती सर्वांसमोर असल्याचं सांगून, विविध विकासात्मक प्रगतीसाठी राज्य ओळखले जात असल्याचं पंतप्रधानांनी समाज माध्यमांवरील संदेशामध्ये नमूद केलं आहे. या विकासकामांमुळे नागरिक आणखी पाच वर्षांसाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारला कौल देण्यास सज्ज झाली असल्याचंही म्हटलं आहे. या सरकारने पुद्दुचेरीतील नागरिकांच्या आकांक्षापूर्ती केल्याचं मोदींनी अन्य एका संदेशात म्हटलं आहे.

**<u>पंतप्रधान-केरळ प्रचार</u>**

पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, या भागातील भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिलं असल्याचां पुनरूच्चार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. केरळम मध्ये काल एका प्रचारफेरीला संबोधित करताना ते बोलत होते. पश्चिम आशियामध्ये केरळमचे नागरिक मोठ्या संख्येने आहेत, त्या पार्श्वभूमीवर एकंदर परिस्थितीवर सरकार बारकाईनं लक्ष ठेवून असल्याचं त्यांनी सांगितलं. या संवेदनशील मुद्द्याचे राजकारण केल्याबद्दल त्यांनी काँग्रेसवर टीकाही केली. आखाती देशांतील भारतीयांची सुरक्षा पणाला लावून राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न विरोधक करत असल्याचे ते म्हणाले. काल झालेल्या मन की बात या संवादातही पश्चिम आशियातल्या युद्धजन्य परिस्थितीमुळं जागतिक पातळीवर अस्थिरतेचं वातावरण आहे, अशा आव्हानात्मक स्थितीतून आपण एकजुटीनं बाहेर पडू या, असं आवाहन पंतप्रधानांनी नागरिकांना केलं आहे.

**<u>केरोसीन</u>**

सध्याच्या भू-राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सरकारने अधिसूचना जारी करून 21 राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत केरोसिन वितरणाला परवानगी दिली आहे. ज्या भागांमध्ये केरोसिनचा वापर बंद करण्यात आला होता, त्या भागात केवळ घरगुती वापरासाठी वितरकांना केरोसिन वितरणाची

परवानगी देण्यात आली असल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने नमूद करण्यात आलं आहे. ही सूचना तत्काळ अमलात आणली आहे. या अधिसूचनेनुसार सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्या स्वतःच्या मालकीच्या विक्री केंद्रांवर पाच हजार लीटर केरोसिन साठवता येऊ शकेल. वितरण प्रक्रिया वेगवान कऱण्यासाठी विक्रेते आणि वाहतूकदारांना परवानाविषयक काही विशिष्ट नियमांमधून सवलत देण्यात आली आहे.

**<u>एलपीजी टँकर</u>**

दरम्यान, 94 हजार टन एलपीजीची वाहतूक करणाऱ्या दोन भारतीय ध्वजधारक जहाजांनी होर्मूझच्या सामुद्रधुनी ओलांडली आहे. ही वाहक जहाजे दोन दिवसांत भारतीय किनाऱ्यांवर पोचण्याची अपेक्षा आहे. तर बीडब्ल्यू टीवायआर जहाज उद्या मुंबईत दाखल होण्याची अपेक्षा असून दुसरे ईएलएम जहाज मंगलोरच्या दिशेने मार्गस्थ झाले आहे.

**<u>लोकसभा</u>**

संसदेच्या अधिवेशनात आज संसदेत नादारी आणि दिवाळखोरी संहिता सुधारणा विधेयक 2025 चर्चेसाठी पटलावर ठेवण्यात येणार आहे. 2016च्या विधेयकामध्ये सुधारणा करण्याच्या हेतूनं नवीन विधेयक चर्चेसाठी येईल. त्याचबरोबर, देशाला डाव्या कडव्या विचारसरणीच्या चळवळीपासून मुक्त करण्याच्या दिशेने करण्यात येणाऱ्या प्रयत्नांवरही सभागृहात चर्चा होणार आहे. तर राज्यसभेत, केंद्रीय सशस्त्र पोलीस दल सामान्य प्रशासन विधेयक 2026 विचारार्थ आणि मंजुरीसाठी चर्चेला घेतले जाईल. हे विधेयक सशस्त्र पोलिस दलांतील काही गटातील अधिकाऱ्यांची भरती आणि सेवेच्या शर्तींबाबतच्या नियमांचे नियमन करणे, या उद्देशाने मांडले जाईल.

**<u>पश्चिम-बंगाल</u>**

पश्चिम बंगालमधील आगामी निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगानं भवानीपूर आणि नंदीग्रामसारख्या महत्त्वाच्या विधानसभा मतदारसंघांचा समावेश असलेल्या 170 पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. आयोगाने 11 उच्चपदस्थ अधिकाऱ्यांसह 184 पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांना आणि पदांच्या फेररचनेला मंजुरी दिली आहे. मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका पार पाडण्याच्या प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. दरम्यान, निवडणूक आयोगाने पश्चिम बंगालमधील चौथी पुरवणी मतदार यादी काल रात्री जाहीर केली. या यादीत किती नावे समाविष्ट किंवा वगळण्यात आली आहेत, याबाबत स्पष्टता नाही. या यादीमध्ये 2 लाख नवीन मतदारांच्या नावांचा समावेश आहे. यासह, चारही पुरवणी याद्या मिळून आतापर्यंत जवळपास 35 लाख नावे प्रकाशित करण्यात आली आहेत.

**<u>अमेरिका-इराण</u>**

अमेरिका मध्य-पूर्वेतील संघर्ष संपवण्यासाठी राजनैतिक प्रयत्न करत असल्याचे दिसत असले तरी अमेरिकेने गुप्तपणे इराणमध्ये जमिनीवरील आक्रमणाची योजना आखल्याचा आरोप इराण संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बागेर कलिबाफ यांनी केला आहे. अशा संभाव्य लष्करी मोहिमांना चोख प्रत्युत्तर दिले जाईल असा इशारा देत हा संघर्ष अत्यंत गंभीर टप्प्यावर पोहोचला असल्याचे त्यांनी म्हटलं आहे. पश्चिम आशियातील तणाव कमी करण्याचा मार्ग शोधण्याचा एक भाग म्हणून, सौदी अरेबिया, इजिप्त, तुर्कस्तान आणि पाकिस्तान या देशांचे परराष्ट्र मंत्री इस्लामाबादमध्ये काल एकत्र आले होते. या बैठकीनंतर कोणतेही संयुक्त निवेदन प्रसिद्ध करण्यात आले नाही. दरम्यान, साडेतीन हजार खलाशी आणि नौसेनेतील  सैनिकांना घेऊन अमेरिकेचे जहाज USS त्रिपोली मध्य-पूर्वेत दाखल झालं आहे अशी माहिती अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने दिली.

**अफगाणिस्तान**

पाकिस्तानच्या लष्कराने, कुनार प्रांतातील असदाबादमध्ये अफगाणिस्तानच्या लष्करावर तोफगोळ्यांचा मारा केल्याचा आरोप अफगाणिस्तानने केला आहे. त्यामध्ये एकाचा मृत्यू झाला असून 16 जण जखमी झाले आहेत. त्यामुळे महिला आणि मुलांचा समावेश आहे. सरकारी उपप्रवक्ते हमदुल्ला फितरत यांनी पाकिस्तानच्या लष्कराने ग्रामीण भागातील नागरी वस्तीवर हल्ला करण्यासाठी तोफांचा आणि मोठ्या शस्त्रांचा वापर केल्याचं म्हटलं आहे. दोन्ही देशांदरम्यान फेब्रुवारीपासून संघर्ष सुरू आहे.

**लेबनॉन इस्रायल**

लेबनानमधील इस्रायलची लष्करी कारवाई अधिक तीव्र झाली आहे. इस्रायलने दक्षिण लेबनानमध्ये क्षेत्रविस्तार करत नव्याने हल्ले सुरू केले आहेत. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेत्यान्याहू यांनी युद्धाच्या क्षेत्रविस्ताराने आदेश दिले असून, त्या मागे हिजबुल्लाहची घुसखोरी रोखणे आणि इस्रायलच्या उत्तर सीमेवरील सुरक्षा बळकट करणे हा उद्देश असल्याचं म्हटलं आहे. या हल्ल्यांमध्ये सीमेजवळ दारुगोळा पेरणाऱ्या हिजबुल्लाच्या सैनिकांना ठार केल्याचंही नमूद करण्यात आलं आहे. तोफांचा मारा आणि हवाई हल्ले करून लेबनानमधील अनेक शहरे लक्ष्य करण्यात आली आहेत.

**सुदान हल्ला मृत्यू**

सुदानमधील कोर्दोफान प्रांतात झालेल्या जीवघेण्या हल्ल्यात पाच मुले, दोन महिलांसह 14 जणांचा मृत्यू झाला आहे. निमलष्करी दलातील जलद प्रतिसाद दल आणि त्यांच्याशी हातमिळवणी केलेल्या बंडखोरांनी हा हल्ला घडवून आणल्याचं सुदान डॉक्टर्स नेटवर्कनं म्हटलं आहे.

**व्यसन मुक्ती बैठक**

व्यसनमुक्ती आणि पुनर्वसन विषयक राष्ट्रीय सल्लागार समितीची पाचवी बैठक काल दिल्लीत पार पडली. सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री डॉक्टर वीरेंद्र कुमार यांनी बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवले.अमली पदार्थांच्या मागणीत घट व्हावी या महत्त्वाच्या मुद्द्यावर समितीच्या सदस्यांनी आपले विचार, सूचना आणि अभिप्राय मांडावेत असे आवाहन केले. अमली पदार्थ सेवनाबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना वाढवण्याच्या गरजेवर तसंच जनजागृती मोहिमा राबवण्यात यावा यावर भर दिला.

**आदिवासी स्पर्धा**

छत्तीसगडमध्ये सुरू असलेल्या पहिल्या 'खेलो इंडिया आदिवासी क्रीडा स्पर्धे'च्या पाचव्या दिवशी, काल रायपूर इथं हॉकी, फुटबॉल आणि भारत्तोलन या स्पर्धा पार पडल्या, तर अंबिकापूर इथं कुस्तीचे सामने झाले. भारत्तोलन स्पर्धेत, महाराष्ट्राच्या साक्षी बुरकुलेने महिलांच्या 86 किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावलं, तर मिझोरमच्या झोसांग झुआलीने 86 किलोपेक्षा अधिक वजनी गटात सुवर्णपदक मिळवले. झारखंड आणि हिमाचल प्रदेशच्या कुस्तीपटूंनी प्रत्येकी दोन सुवर्णपदकं पटकावली. मिझोरमच्या भारत्तोलकांनी दोन सुवर्णपदकं तर जम्मू आणि काश्मीरने कुस्तीमध्ये एक सुवर्ण आणि एक रौप्यपदक मिळवत आपल्या पदकांचं खातं उघडलं. या क्रीडा स्पर्धा 25 मार्चपासून सुरु असून त्या 3 एप्रिलपर्यंत चालतील. 30 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील तीन हजारांहून अधिक खेळाडू यामध्ये सहभागी होत आहेत

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेटमध्ये काल रात्री मुंबईत झालेल्या वानखेडे स्टेडियमवर झालेल्या दुसऱ्या सामन्यात मुंबई इंडियन्सने कोलकाता नाईट रायडर्सचा सहा गडी राखून पराभव केला. कोलकाता नाईट रायडर्सने चार बाद 220 धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरादाखल मुंबई इंडियन्सने रोहित शर्माच्या 78 आणि रायन रिकल्टनच्या 81 धावांच्या जोरावर 19 षटकं एक चेंडूत विजयी धावसंख्या गाठली.

**हवामान**

भारतीय हवामान विभागानं मध्य महाराष्ट्र, पूर्व राजस्थान, दिल्ली, चंडिगढ, हरियाणा, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड भागात मेघगर्जनेसह गारपीट होण्याची शक्यता वर्तवत नारंगी बावटा दिला आहे. तर मराठवाडा, पश्चिम मध्य प्रदेश भागातही अशी परिस्थिती राहिल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. पुढील दोन दिवसांत देशाच्या काही भागात पावसाचा अंदाजही वर्तवण्यात आला आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार